महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११

email : ciro@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in

जा.क्र. : औसंवि/ब/ककनिस/५४वी बैठक/१८८८१ दिनांक : ०६/०७/२०१२

# परिपत्रक

विषय : कर्मचारी कल्याण निधी समितीच्या ५४ व्या बैठकीत घेण्यात आलेले निर्णय.

*************

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ कर्मचारी कल्याण निधी समितीची ५४ वी बैठक दि. १९/०५/२०१२ रोजी सांघिक कार्यालय, प्रकाशगड, वांद्रे (पूर्व), मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीत पुढीलप्रमाणे निर्णय घेण्यात आले आहेत.

१) कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती मंजूर करण्याच्या प्रचलित पध्दतीमध्ये अंशतः बदल करुन गुणवत्तेच्या आधारावर शिष्यवृत्ती मंजूर करण्याकरिता खुल्या प्रवर्गा ऐवजी सर्वसाधारण खुल्या गुणवत्तेनुसार (Open Merit) असा प्रवर्ग करुन त्यात वेतनगटनिहाय प्राप्त झालेले सर्व अर्ज ज्यामध्ये खुला व राखीव प्रवर्गातील अर्जांचा समावेश असेल असे सर्व अर्ज वेतनगटनिहाय गुणानुक्रमे लावून त्या वेतनगटात मंजूर शिष्यवृत्तीची संख्या २० असल्यास गुणानुक्रमे पहिल्या १२ पाल्यांना तसेच शिष्यवृत्तीची संख्या १५ असल्यास गुणानुक्रमे पहिल्या ०९ पाल्यांस सर्व साधारण खुल्या गुणवत्तेनुसार (Open Merit) शिष्यवृत्ती मंजूर करण्यात यावी. तसेच सर्व साधारण खुल्या गुणवत्तेनुसार (Open Merit) शिष्यवृत्तीचे वाटप झाल्यानंतर वेतनगटनिहाय राखीव प्रवर्गातील शिष्यवृत्तीचे वाटप करतांना प्राप्त झालेले उर्वरित सर्व अर्ज एकत्रित करुन त्या जातीसाठी विद्यमान पध्दतीनुसार आरक्षित असलेल्या संख्येनुसार त्या पाल्यांना गुणानुक्रमे शिष्यवृत्ती मंजूर करण्यात यावी. हा निर्णय सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापासून अंमलात आणण्यात येईल.

२) परिमंडळनिहाय मंजूर करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीमधून सर्व साधारण खुल्या गुणवत्तेनुसार (Open Merit) प्रवर्ग व राखीव प्रवर्गातील कर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शिष्यवृत्तीचे वाटप झाल्यानंतर त्या - त्या परिमंडळातील काही वेतनगटातील सर्व साधारण खुला प्रवर्ग किंवा राखीव प्रवर्गातील काही शिष्यवृत्ती शिल्लक राहिली असल्यास त्याच परिमंडळातील सर्व वेतनगटातील शिष्यवृत्ती न मिळालेल्या पाल्यांची गुणानुक्रमे मिश्र यादी (Balance Applications Merit List For Zone) तयार करुन शिल्लक राहिलेल्या शिष्यवृत्तीच्या संख्येनुसार पाल्यांना गुणानुक्रमे शिष्यवृत्ती मंजूर करण्यात यावी. तसेच गुणवत्तेच्या आधारावर परिमंडलनिहाय सर्व पाल्यांना शिष्यवृत्तीचे वाटप केल्यानंतर त्या - त्या परिमंडलनिहाय मंजूर करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीपैकी काही शिष्यवृत्ती शिल्लक राहिली असल्यास सर्व परिमंडलातील पाल्यांची गुणवत्तेच्या आधारावर एक मिश्र यादी (Balance Applications Merit List For State) तयार करुन शिल्लक राहिलेल्या शिष्यवृत्तीच्या संख्येनुसार पाल्यांना गुणानुक्रमे शिष्यवृत्ती मंजूर करण्यात यावी. हा निर्णय सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापासून अंमलात आणण्यात येईल.

३) वेतनगटनिहाय सर्वसाधारण खुल्या गुणवत्तेनुसार (Open Merit) या प्रवर्गात सर्व खुल्या व राखीव प्रवर्गातील अर्जांचा एकत्रितरित्या समावेश करुन गुणानुक्रमे शिष्यवृत्ती मंजूर करण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे विद्यमान रोखपारितोषिक देण्याच्या पध्दतीमध्ये बदल करुन वेतनगटनिहाय सर्वसाधारण खुल्या गुणवत्तेनुसार (Open Merit) प्रवर्ग तसेच राखीव प्रवर्गातील शिष्यवृत्ती प्राप्त पाल्यांना

रु. ५००/- या दराने रोखपारितोषिक देण्यात यावे. तसेच परिमंडळनिहाय मंजूर करण्यात आलेल्या शिष्यवृत्तीमधून काही शिष्यवृत्ती शिल्लक राहिली असल्यास त्या शिष्यवृतीचे त्या -त्या परिमंडळात शिष्यवृत्ती न मिळालेल्या पाल्यांची मिश्र यादी करुन किंवा राज्य स्तरावर सर्व परिमंडळातील पाल्यांची गुणवत्तेच्या आधारे एक मिश्र यादी तयार करुन वाटप करताना गुणानुक्रमे शिष्यवृत्ती प्राप्त पाल्यांना रु. ३००/- या दराने रोखपारितोषिक देण्यात यावे. हा निर्णय सन २०१२-१३ या शैक्षणिक वर्षापासून अंमलात आणण्यात येईल.

४) क्रीडा क्लबच्या माध्यमातून कर्मचारी व त्यांच्या परिवारासाठी नवीन वाचनालय सुरु करण्यासाठी सर राजा राममोहन रॉय लायब्ररी फाउंडेशन तर्फे सर्व समावेशक पुस्तकांची यादी उपलब्ध होत नसल्यामुळे त्याऐवजी शासनाच्या ग्रंथालय संचालनालयातर्फे प्रकाशित करण्यात आलेली सर्व समावेशक पुस्तकांची यादी सांघिक कार्यालयाच्या वतीने परिमंडळ कार्यालयास वाचनालयासाठी पुस्तके खरेदी करण्याकरिता पुरविण्यात यावी. तसेच क्रीडा क्लबच्या माध्यमातून वाचनालय सुरु करण्यासाठी क्रीडा क्लबची नोंदणी बंधनकारक असणे ही अट शिथिल करणे.

५) कर्मचारी कल्याण निधी समितीच्या माध्यमाने सुरु करण्यात आलेल्या आंतर कंपनी क्रीडास्पर्धेत खालील बाबींचा समावेश करणे.

अ) आंतर कंपनी क्रीडास्पर्धेत पुरुष व महिलांकरिता आंतरगृह खेळ जसे टेबल टेनिस, बॅडमिंटन, कॅरम व बुध्दीबळ या ०४ खेळांचा समावेश राहील.

ब) आंतर कंपनी क्रीडास्पर्धेचा कालावधी ०३ दिवसाचा राहील.

६) ५३ व्या बैठकीत ज्या कर्मचाऱ्यांच्या पाल्यांची देशाबाहेर आयोजित आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त क्रीडास्पर्धा / एन.सी.सी. कॅम्प, स्कॉऊट गाईड कॅम्प मध्ये सहभागी होण्यासाठी निवड झाली असेल त्यांना सदर क्रीडास्पर्धेत / कॅम्पमध्ये सहभागी झाल्याचे प्रमाणपत्र सादर करण्याच्या अटीवर रु. २५,०००/- आर्थिक मदत देण्यात यावी असा निर्णय घेण्यात आला. त्याऐवजी कर्मचाऱ्यांच्या पाल्यांस देशाबाहेर आयोजित आंतरराष्ट्रीय स्तरावरील मान्यताप्राप्त क्रीडास्पर्धा / एन.सी.सी. कॅम्प, स्कॉऊट गाईड कॅम्पमध्ये सहभागी होण्यासाठी आर्थिक मदतीची गरज असल्यास सदर स्पर्धा / कॅम्पमध्ये सहभागी होण्यापूर्वी आर्थिक मदत मिळण्याबाबतचा अर्ज सादर केल्यास त्यांना क.क.निधीमधून रु. २५,०००/- आर्थिक मदत देण्यात यावी अशी सुधारणा करणे.

किशोर पवार

(किशोर पवार)

सदस्य / सचिव, क.क.नि.समिती तथा
मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी

प्रत सविनय सादर :

१) संचालक (वित्त), म.रा.वि.मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित, प्रकाशगंगा, वांद्रे, मुंबई.

२) कार्यकारी संचालक (मासं), महावितरण / महानिर्मिती / महापारेषण, मुंबई.

प्रत सस्नेह :

मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, महानिर्मिती / महापारेषण, मुंबई.

-- आपणास विनंती करण्यात येते की, आपल्या कंपनी अंतर्गत उपरोक्त निर्णयाची अंमलबजावणी करण्याची कार्यवाही करावी.

प्रत : महावितरण कंपनीच्या प्रेषण यादीनुसार कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.

D:\SSPisey\SWFC\54baithak karyvrutant.doc